दैनिक अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १६ वे • अंक ३५५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.२२ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# म्हसळा तालुक्यात होणार नवी एमआयडीसी

## म्हसळा, श्रीवर्धनमध्ये उभे राहणार व्यापाराचे नवे दालन

**दै.रायगड नगरी । दिघी**

म्हसळा तालुक्यातील खनलोशी येथे नवे औद्योगिक क्षेत्र उभारण्यात येणार आहे. कोकणातील दिघी पोर्ट जवळ नवे औद्योगिक शहर विकसित करण्यासाठी औरंगाबाद इंडस्ट्रिअल टाउनशिपच्या प्रशासनाने औद्योगिक प्रकल्प व्यवस्थापन कामांकरिता विनंती प्रस्ताव निविदा प्रसिद्ध केली आहे. दिघी पोर्ट इंडस्ट्रिअल एरिया (DPIA) हा दिल्ली – मुंबई औद्योगिक क्षेत्रातील (DMIC) शेवटचा टप्पा आहे.

> खनलोशी येथे एमआयडीसी उभारण्यासाठी मध्यंतरी सभागृहात चर्चा झाली. खासदार सुनील तटकरे यांचा पर्यावरण पूरक व पर्यावरणाला हानी पोचणार नाही अश्या उद्योगांसाठी नेहमी आग्रही असतात. सध्या आदिति तटकरे या जिल्ह्याच्या पालकमंत्री तसेच क्रीडा व उद्योग राज्यमंत्री आहेत त्यामुळे मुंबई स्थित गावाकडील तरुणांना गावी रोजगार मिळवण्यासाठी त्यासुद्धा आग्रही आहेत. पर्यावरण पूरक उद्योगांना आमचा विरोध असण्याचे कारण नाही मात्र एमआयडीसी व शासनानेही जमिनीला योग्य भाव द्यावा ही मागणी आहे.
>
> **: आ.अनिकेत तटकरे**

स्मार्ट औद्योगिक व निवासी सुविधा विकसित करण्यासाठी डिएमआयसीने दहा वर्षांपुर्वी तळा तालुक्यातील भुसंपादन प्रक्रिया सुरू केली होती परंतु शेतकरी भुमिहिन होतील या कारणास्तव त्याला विरोध झाला होता. या विरोधामुळे तळा तालुक्यातील DMIC भुसंपादन रद्द करण्यात आले होते. सध्या कोलाड व माणगांव नजीक भुवन, दुरटोली, विघवली ते निजामपुर दरम्यान दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरने पुर्वीच संपादित केलेल्या जमिनीवर स्मार्ट सिटी उभारण्याची प्रक्रिया सुरू होत असल्याचे दिसुन येत आहे.

अन्नप्रक्रिया, औषधनिर्माण, अभियांत्रिकी क्षेत्रातील उद्योगासाठी हे शहर उभारण्याचे नियोजन बाबत औरंगाबाद औद्योगिक टाऊनशीप ने विनंती प्रस्ताव मागितली आहेत. यासोबतच प्रत्यक्ष दिघी पोर्टजवळील खनलोशी गावात देखील ९४ हेक्टर जमिनीवर बंदरावर आधारीत औद्योगिक आस्थापनांकडुन महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) ने स्वारस्य निविदा देखील एकाच दिवशी प्रसिद्ध केल्या आहेत.

> म्हसळा - श्रीवर्धन मधील तरुण रोजगाराच्या अपेक्षेने दिघी पोर्ट व दास ऑफशोर या कंपन्याकडे गेली कित्येक वर्षे डोळे लावून बसलेत. मात्र अजूनही आपल्या भागातील तरुणांना रोजगारासाठी मुंबई व इतर शहरां शिवाय पर्याय नाही ही वस्तुस्थिती आहे. सद्या रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा दोन्ही प्रकल्पाच्या औद्योगिक विकासाच्या गतीला खीळ बसल्याने तरूणांना न्याय देण्याचा दृष्टिकोनातून ही खूप गंभीर बाब आहे.
>
> **- महेश पाटील, अध्यक्ष,**
> **१८ गाव आगरी समाज संघटना**

नवीन खानलोशी एमआयडीसी मध्ये वेअरहाऊसिंग, कोल्ड स्टोरेजेस, प्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग उद्योग व इंपोर्ट एक्सपोर्ट हाउसेस ना उद्योग उभारणीसाठी आमंत्रित करण्यात आलेले आहे. खनलोशी पासून दिघी बंदर हे १३ किलोमीटर तर जेएनपीटी १३० किलोमीटर अंतरावर आहे.

आयात निर्यात, सप्लाय चेन, लॉजिस्टिक्स, कस्टम क्लिअरिंग, मर्चंट नेव्ही इ. चे मॅनेजमेंट व सर्टीफिकेट कोर्सेस आम्ही इथेच सुरु करू अशी भुमिका कोकणातील एकाही नेत्यांने घेतली नव्हती की आता घ्यावी लागेल. मुंबईत असे अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांमध्ये इथल्या तरूणांनी प्रशिक्षण घ्यावे जेणेकरून हक्काचा रोजगार आपल्या गावाजवळ आपल्याला मिळेल. फोर्क लिफ्ट, क्रेन ऑपरेटर, ड्रायव्हर, पॅकेजिंग यातील प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष असे अनेक रोजगार उद्योगातुन निश्चीतच सुरू होतील यात तिळमात्र शंका नाही.

# कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत बिंगो सुरूच

## कामोठे पोलिसांच्या कारवाईला बिंगो चालकांकडून मुठमाती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऑनलाइन गेमच्या नावाखाली बिंगो जुगार खेळणाऱ्यांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील बिंगोवर कारवाई करण्यात आलेली असली तरी देखील पुन्हा येथे पुन्हा बिंगो खेळला जात आहे. त्यामुळे बिंगोरुपी जुगार खेळणाऱ्यांना कायद्याचे भय राहिले नाही असे दिसून येत आहे.

कामोठे, सेक्टर ३४ येथे संगणकावर ऑनलाइन गेमच्या नावाखाली बिंगो जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. कामोठे पोलिसांनी दोघां विरोधात महाराष्ट्र जुगार कायदा कलम अंतर्गत गुन्हा दाखल केला. पोलिसांनी येथून संगणक, सीपीयू व इतर साहित्य मिळून २१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. गुन्हा दाखल केल्यानंतर देखील येथे ऑनलाईन बिंगो सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बिंगो चालविणाऱ्यांना पोलिसी कारवाईचा धाक उरला नसल्याचे स्पष्ट होत आहे.

# पाली बस स्थानक नुतनीकरण व इमारत पुनर्बांधणीला मुहूर्त केव्हा?

## सुधागडकरांचा संतप्त सवाल



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील जीर्ण आणि जर्जर झालेल्या बस स्थानकाची इमारत जवळपास वर्षभरापूर्वी पाडण्यात आली आहे. मात्र त्या ठिकाणी नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीस व नूतनीकरणास अजूनही सुरुवात झालेली नाही. येथे जणूकाही खंडर झाले आहे. इमारत बांधणी व व स्थानकात नुतनीकरण कामांसाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र ठेकेदाराला चालु वाढीव दर हवे असल्याने काम खोळंबले आहे. अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

स्थानकाची जुनी इमारत पाडली खरी मात्र जुन्या इमारतीचा राडारोडा येथे तसाच ठेवण्यात आलेला आहे. बाजूला तात्पुरता स्वरूपात प्रवाशी व कर्मचारी शेड बांधण्यात आली आहे. मात्र परिपूर्ण बस स्थानक इमारती अभावी प्रवासी व परिवहन कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे.अनेक वर्षे धोकादायक स्थितीतल्या बस स्थानकाची इमारत तोडून त्याठिकाणी नवीन इमारत उभी रहावी यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वारंवार राज्य परिवहन महामंडळाकडे मागणी करण्यात येत होती. यासाठी सामाजिक कार्यकर्ते, नागरिकांकडून उपोषणे

.../२

# तळोजा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आली भव्य मिरवणूक




**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजे येथे मा. म्हाडा अध्यक्ष, शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार व दि. बा. पाटिल प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील ह्यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. ह्यावेळी स्थानिक नागरिकांसह हजारो मुस्लिम बांधव तसेच केजीपी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी सहभागी झाले होते..

सदर कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख शिरिष घरत, काँग्रेस जिल्हाप्रमुख आर. सी. घरत, राष्ट्रवादी सरचिटणीस सुदाम पाटील, जिल्हाध्यक्ष सतिश पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजप नगरसेवक हरेश केणी, तालुकाप्रमुख एकनाथ म्हात्रे, उपमहानगरप्रमुख कैलास पाटील, दिपक घरत, काँग्रेसचे चिटणीस बबन केणी, राष्ट्रवादीचे ताहिर पटेल, युवासेना जिल्हा समन्वयक नितिन पाटिल आदी उपस्थित होते, शहरप्रमुख प्रदीप केणी, माजी शहरप्रमुख बाळा मुंबईकर, मिथुन मढवी आदी उपस्थित होते.

# उल्हास नदी संवर्धन व सुशोभीकरणासाठी ४६ कोटी रुपयांचा निधी मंजूर : आ.महेंद्र थोरवे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्याच्या सर्व भागात विकासाची कामे सुरू असताना नदी संवर्धन महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांना ही योजना शहराच्या विकासासाठी महत्वाची आहे हे पटवून दिले आणि कर्जत उल्हास नदी संवर्धन कामासाठी ४६ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी दोन किलोमीटर साठी असून अतिरिक्त तीन किलोमीटरच्या संवर्धनासाठी आणखी निधी लागणार आहे हे लक्षात घेऊन या प्रकल्पासाठी लागणारी अतिरिक्त निधी देण्याचे आश्वासन आदित्य ठाकरे यांनी दिले आहे. त्यामुळे आपल्या उल्हास नदीचे संवर्धन व सुशोभीकरण चांगल्या प्रकारे होईल.' असा विश्वास आमदार महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला.



उल्हास नदी निर्मल जल अभियानच्या वतीने उल्हास नदी पूरनियंत्रण आणि स्वच्छता परिषदेचे आयोजन हानी मंदिर देवस्थानच्या रविकिरण सभागृहात करण्यात आले होते. हिरवळ प्रतिष्ठान चे किशोर धारिया यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून परिषदेचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, पुंडलिक पाटील, पाटबंधारे विभागाचे अधिक्षक अभियंता राकेश धाकतोडे आदी उपस्थित होते.

मुकुंद भागवत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. समीर सोहनी यांनी प्रास्ताविकात परिषदेचा उद्देश सांगितला. डॉ. नितीन आरेकर यांनी,' आपण शासन किंवा प्रशासनावर ताशेरे ओढायला आलो नसून आपली नदी वाचविण्यासाठी जमलो आहोत.' असे सुरुवातीलाच स्पष्ट केले. त्यानंतर सुरेश खानविलकर, नगरसेवक राहुल डाळिंबकर यांनी, 'यापूर्वी माजी आमदार सुरेश लाड यांनी नदी स्वच्छता करण्याचा चांगला प्रयत्न केला. त्याचे फलित सुद्धा आपण अनुभवले आहे. आता सर्वांनी मिळून नदी संवर्धनाचे काम केले पाहिजे.' असे सूचित केले. प्रवीण गांगल यांनी 'या परिषदेला मुख्याधिकारी उपस्थित रहायला पाहिजे होते म्हणजे त्यांना

.../२

## संक्षिप्त...

### परिवहन बसेसना डिझेल दरवाढीतून सूट द्या; पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रशिया–यूक्रेन युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. त्यातच डिझेलच्या दरात तब्बल २५ रुपयांनी वाढ झाली आहे. जे बल्क कस्टमर आहेत त्यांना जादा पैसे देऊन इंधन खरेदी करावं लागणार आहे. त्यामुळे देशातील राज्य सरकारे आणि महापालिका परिवहन बसेसनाही याचा फटका बसणार आहे. त्यामुळे या वाढीचा भार सर्वसामान्यांवर पडण्याची शक्यता आहे.

याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र पाठवलं आहे. सरकारी बसेस आणि महापालिका बसेस यांना डिझेल दरवाढीतून सूट देण्यात यावी अशी विनंती करणारे निवेदन मोदींना पाठवलं आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये होत असलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ लक्षात घेता केंद्रसरकारने घाऊक ग्राहकांसाठी डिझेलच्या दरात प्रति लिटर २५ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या निर्णयाचा सरकारी आणि महानगरपालिका परिवहन सेवांवर आर्थिकदृष्ट्या विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. मुंबईत तर डिझेलचे दर १२२ रुपये प्रति लीटर इतके झाले आहे. त्यामुळे डिझेलवर चालणाऱ्या परिवहन सेवांचे दरही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शिवजयंतीनिमित्त रायगड जिल्हा मनसेतर्फे विविध कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील ओवळे गावात शिवजयंतीनिमित्ताने डिजिटल बोर्ड व सेल्फी पॉईंटचा भव्य उद्घाटन सोहळा मोठ्या दिमाखात पार पाडला. मनसेचे ठाणे व पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या हस्ते डिजिटल बोर्ड व सेल्फि पॉईंटचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी मनसे रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत व महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे सरचिटणीस सचिन गोळे, महिला जिल्हाध्यक्ष आदिती सोनार, रायगड उपजिल्हाध्यक्ष दीपक कांबळी, पनवेल तालुकाध्यक्ष अविनाश पडवळ, पनवेल महापालिका कर्मचारी सेना अध्यक्ष प्रसाद परब यांच्यासह



आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.याचबरोबर शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला कुंडेवहाळ गावात महाराष्ट्र नवनिर्माण शाखेचे उद्घाटन ठाणे व पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत व मनसे कामगार सेनेचे सरचिटणीस सचिन गोळे यांच्यासह आदी मान्यवरांनी कुंडेवहाळच्या सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कुंडेवहाळ व ओवळे गावातील शेकडो तरुण–तरुणींनी तसेच नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश केला.

# जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गांवर टेम्पो पलटी



**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गां क्रमांक –०४ वर मुंबई हुन पुणे कडे भरधावं वेगाने जाणारा टेम्पो पलटी झाला आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार रविवार (दि.२०) सकाळी पाठे ५.०० वाजता मुंबई हुन पुणे कडे जाणारा टेम्पो हाजी अब्दुल लतीफशाह बाबांच्या दर्गेच्या हद्दीत एक्स्पोर्ट होणाऱ्या माळाने भरलेला टेम्पो क्रमांक –(एमएच–०३–सीपी –९९९७) भरधाव वेगाने जात टेम्पो चालकाला झोपेची झूलकी लागल्याने टेम्पोवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो रस्तेवर सुरक्षा साठी लावण्यात आलेले लोखंडी बेरीगेडला तोडून रस्तेवरून खाली पलटी झाला आहे.

सुदैवाने टेम्पो चालक आमरेश कुमार मिश्रा (सोनू ),रा.उत्तर प्रदेश –वय वर्षां –३२ हा सुखरूप बचावला असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले.

# महाराष्ट्रातील ६ मान्यवरांना 'पद्म पुरस्कार' प्रदान

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां'चे वितरण आज राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्रातील ६ मान्यवरांना त्यांच्या क्षेत्रातील अतुलनीय योगदानासाठी 'पद्म पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील एका शानदार समारंभात पद्म पुरस्कार राष्ट्रपती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती वैंकय्या नायडु, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण उपस्थित होते. आज प्रथम टप्प्यात पार पडलेल्या पद्म पुरस्कार समारंभात राज्यातील चार मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये डॉ. सायरस पुनावाला आणि एन.चंद्रशेखरन यांना 'पद्मभूषण पुरस्कार' तर डॉ.भिमसेन सिंघल, डॉ.विजयकुमार डोंगरे, डॉ.हिंमतराव बावस्कर तसेच डॉ.अनिलकुमार राजवंशी यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ.सायरस पुनावाला यांना उद्योग व व्यापार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी 'पद्मभूषण पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. श्री.पुनावाला हे सुप्रसिद्ध औषधी निर्माता आहेत. जगातील सर्वात मोठी औषधी निर्माण करणारी सिरम संस्थेचे ते संस्थापक आहेत. कोरोना माहामारीच्या साथीत या संस्थेने तयार केलेली लस सर्व भारतीयांना तसेच अन्य देशातील लोकांनाही सर्वोउपयोगी ठरली. त्यांच्या या कार्याची दखल घेत आज त्यांना सन्मानित करण्यात आले.

एन.चंद्रशेखरन यांनाही उद्योग व व्यापार क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. श्री चंद्रशेखरन हे टाटा सन्सचे अध्यक्ष आहेत. ते भारतील एक नामांकित उद्योजक आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत आज त्यांना गौरविण्यात आले.

वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय

.../२



# स्थानिक नगरसेविका अनिता पाटील यांच्या माध्यमातून महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्थानिक नगरसेविका अनिता पाटील यांच्या माध्यमातून भव्यदिव्य हळदीकुंकू समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम व नृत्य स्पर्धा, महिला सुरक्षा अभियान कार्यक्रम रविवार दिनांक २० मार्च २०२२ रोजी शिवमंदिर मैदान पेणकरपाडा येथे हळदीकुंकू समारंभ उत्साहात पार पडला. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत, आपल्या महिलांसाठी प्रशासनामार्फत बरेच योजना आलेल्या आहेत त्यासाठी महिलांनी सतर्क राहून त्या उपायोजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता आला पाहिजे. स्त्री जर आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि सुरक्षा च्या बाबत आत्मनिर्भर झाली तरच समाजाची प्रगती होईल, विभागातील महिला सबळीकरण आणि युवावर्ग लहान थोर लोकमंडळी एकत्र येण्याकरिता तसेच महिलांच्या कला गुणांना वाव देण्याकरीता गेली अठरा वर्षापासून हळदीकुंकूचे आयोजन करण्यात येते असे स्थानिक नगरसेविका अनिता पाटील यांनी मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमात महिला एकत्रीकरण्यासाठी महिलांशी थेट संवाद साधुन महिला बचत गटाचे महत्व, महिला सक्षमीकरण व महिला सुरक्षा विषयी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास माजी आमदार नरेंद्र मेहता, महापौर ज्योत्स्ना हसनाले ,माजी महापौर तथा नगरसेविका डिंपल मेहता, महिला बालकल्याण सभापती मीरादेवी यादव, नगरसेविका मीना कांगणे, नगरसेविका



रुपाली मोदी ,आयोजक स्थानिक नगरसेविका अनिता जयवंत पाटील, भारती मकवाना, उषा मकवाना,पार्वती पाटील, निलेश पाटील, संतोष राऊत, कामगार नेते प्रभाकर गायकवाड दिपक पाटील, गणेश पाटील, दिलीप चव्हाण, मनोज रवंदे, मनोज यादव मोठ्या संख्येने स्थानिक रहिवाशी उपस्थित होते.

# वडवली येथे रक्तदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । दिघी**

वडवली येथील सहकार्य सामाजिक शिक्षण संस्था व मुंबई स्थित वडवली आगरी युवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज जयंती चे औचित्य साधून रविवारी (ता. २०) संत निरंकारी सत्संग भवन सभागृहामध्ये महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी वडवली व पंचक्रोशीतील युवक व युवतींनी रक्तदान करून राष्ट्रकार्यात योगदान दिले. सदर शिबिराचे उदघाटन वडवली आगरी समाज अध्यक्ष संतोष नात्की यांच्या शुभहस्ते व वडवली आगरी समाज मुंबई अध्यक्ष सुरेश नात्की यांच्या अध्यक्षतेखाली वडवली ग्रामपंचायत सरपंच प्रियंका रुपेश नात्की यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी वडवली ग्रामपंचायत उपसरपंच सुरेश धुमाळ, माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य दिपक कांबळे, संत निरंकारी मंडळ वडवली चे मुखी गणेश नात्की, वडवली आगरी समाज उपाध्यक्ष किशोर बिराडी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गावातील सचिन नात्की यांनी ५६ व्या वेळी रक्तदान केले. संस्थेचे ज्येष्ठ सदस्य तथा खजिनदार सुनील नात्की, मुकेश पेरवे, संकेत नात्की, ऋषिकांत बिराडी, कैलास धनावडे व अन्य मान्यवर उपस्थित होते. रक्तदान शिबिरामध्ये एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. आयोजक संघटना अध्यक्ष धनंजय चौलकर व सदस्य तसेच संस्था अध्यक्ष निलेश नात्की व सदस्य यांनी सर्व रक्तदात्यांचे मनस्वी आभार मानले. अलिबाग येथील जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. शरद गोसावी व टीम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# शरीरशौष्ठव स्पर्धेच्या विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल-उरण महाविकास आघाडी व जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था आयोजित गावदेवी महोत्सव २०२२ ला पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली.

यावेळी आयोजित शरीरशौष्ठव स्पर्धेच्या विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह नगर-सेवक गोपाळ भगत, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, शेकाप युवा नेते किरण दाभणे, शेकाप युवक संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष देवेंद्र पाटील, युवा नेते पराग भोपी तसेच पनवेल-उरण महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रेक्षक उपस्थित होते.

# उरण तालुक्यात तिथीनुसार शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील शिव-सेनेचे पदाधिकारी, मनसेचे पदाधिकारी आणि शिव प्रेमी यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव तिथीनुसार मोठ्या उत्साहात साजरा केला .या जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून मी उरणकरच्या माध्यमातून शिवकालीन शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शन सोहळ्याचे आयोजन उरणमध्ये करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून चिरनेर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुध अभिषेक, जन्मोत्सव,पालखी मिरवणूक काढण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन शिव-सेनेचे तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी उद्योगपती राजेंद्र खारपाटील व उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील मनसेचे पदाधिकारी संदेश ठाकूर व तालुका उपाध्यक्ष सत्यवान भगत यांनी सालाबादप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विधीपूर्वक पूजा अर्चा करून तिथीनुसार शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. तसेच मी उरणकरच्या वतीने तरुण पिढीला छत्रपती शिव-ाजी महाराजांच्या शस्त्रास्त्रांचे दर्शन व माहिती उपलब्ध व्हावी यासाठी उरण शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत मंजुळा जनार्दन म्हात्रे व इतर ८ यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देण्यात येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णत : निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट** : तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे : पिरकोन येथील मिळकत भूमापन / सर्व्हे नं.१८१, हिस्सा ४/ड यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर १९ आर ७० प्रति, व पोटखराबा ०० हेक्टर ०२ आर ०० प्रति, यांसी आकार रक्कम रुपये ३.०० पैसे, यांसी चतुः सिमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.

रायगड, तारीख २१ मार्च २०२२

**सही/-**
**श्री.विनायक ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकील**
**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र.८६६८५५१३१२**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पाली बस स्थानक नुतनीकरण व इमारत पुनर्बांधणीला मुहूर्त केव्हा?

व आंदोलने देखील करण्यात आली. २०१६ मध्ये रिपाइं रायगड जिल्हा सचिव रवींद्रनाथ यांनी नवीन बस स्थानकाकरिता आमरण उपोषण केले. यावेळी त्यांच्या उपोषणाला व नागरिकांच्या मागणीला यश आले आणि पाली बस स्थानकाच्या नवीन इमारतीकरिता राज्य परिवहन महामंडळाकडून निधी उपलब्ध करण्यात आला. परंतु काही वर्षे जाऊन सुद्धा परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाच्या पुनर्बांधणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. दरम्यान रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी पुन्हा मागील वर्षी मार्च महिन्यात पाच दिवस उपोषण केल्यानंतर नवीन इमारत बांधण्यासाठी परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाची धोकादायक इमारत जमीनदोस्त करण्यात आली. परंतु वर्ष उलटून गेले तरी परिवहन महामंडळ नवीन इमारतीच्या पुनर्बांधणी कडे कानाडोळा करत असल्याचे दिसत आहे.

## उल्हास नदी संवर्धन व सुशोभीकरणासाठी ४६ कोटी रुपयांचा निधी मंजूर : आ.महेंद्र थोरवे

कर्जतकरांच्या व्यथा समजल्या असत्या' असे सांगितले. नंदन भडसावळे यांनी, ' मी बावीस पुरांचा साक्षीदार आहे. त्यामुळे यापुढे असा प्रसंग होऊ नये म्हणून बंदोबस्त करणे गरजेचे आहे.' अशी अपेक्षा व्यक्त केली. शशांक शेट्टी यांनीही व्यथा मांडली. यावेळी ४० प्लस टीम स्पर्धांच्या माध्यमातून मिळालेले उत्पन्न अभियानाच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले.

पुंडलिक पाटील यांनी, आपणच नदीत कचरा टाकतो आणि तीच नदी आपण स्वच्छ करावी म्हणून परिषद घेतो ही शरमेची गोष्ट आहे. सगळं शासनानेच करावे अशी आपली अपेक्षा असते. शासन म्हणजे आपणच आहोत हे जरी आपण लक्षात ठेवले तरी सारे काही ठीक होईल. खरे तर खेडोपाडी गल्ली गल्लीत पेव्हर ब्लॉक, कॉंक्रीटीकरण होत असल्याने पाहिजे तितके पाणी जमिनीत मुरत नाही.' असे सांगितले. राकेश धाकतोडे यांनी उपस्थितांना जला विषयीची प्रतिज्ञा दिली. उल्हास नदीची लांबी १४५ किलो मीटर आहे तर पाणलोट क्षेत्र ४५३८ आहे.' अशी माहिती दिली. याप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी यावेळी बोलताना शहरात स्वच्छता नांदावी यासाठी भुयारी गटार व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करणे गरजेचे आहे. हा प्रकल्प राज्य सरकारच्या विचाराधीन असलेला हा प्रकल्प लवकरच मंजूर होईल. नदी संवर्धन चे दोन टप्पे मंजूर झाले आहेत. ते लवकरात लवकर कार्यान्वित होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.' अशी अपेक्षा व्यक्त केली.

जलनायक किशोर धारिया यांनी, 'वाहत्या पाण्याचे साक्षीदार असलेलो आपण सर्व उल्हासनदी प्रदूषित झाली म्हणून ओरड करतो. त्या उल्हास नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीखाली उपाययोजना राबविली जाणार आहे. त्यासाठी कर्जत येथील तरुण वर्गाने हाती घेतलेले काम यशस्वी होईल. कर्जत तालुक्यातील जलसैनिक सहभागी करून घेण्यासाठी स्वच्छता अभियान अग्रभागी असल्याने नदी सर्वधनासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येतील. असे जाहीर केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन आरेकर तर आभार प्रदर्शन विकास चित्ते यांनी केले. याप्रसंगी राजेश लाड, भारती पालकर, पुष्पा दगडे, संचिता पाटील, मधुरा चंदन, संतोष पाटील, सोमनाथ पालकर, रणजीत जैन, ऍड. कैलास मोरे, प्रभाकर गंगावणे, रंजन दातार, राजाभाऊ कोठारी, मीना प्रभावळकर आदींसह कर्जतकर मोठया संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील ६ मान्यवरांना 'पद्म पुरस्कार' प्रदान

कार्यासाठी डॉ.भिमसेन सिंघल यांना 'पद्मश्री पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. डॉ.सिंघल हे नामांकित न्यूरोलॉजिस्ट आहेत. डॉ.सिंघल यांनी मज्जतंतूचा शास्त्रीयरीत्या अभ्यास केलेला आहे. धमन्या आक्रसणे (स्क्लेरोसिस) आणि पार्किन्सन रोगावर त्यांचे संशोधन जगमान्य आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करीत त्यांना आजा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ.विजयकुमार डोंगरे यांना कुष्ठरोगांवर केलल्या निस्वार्थ उपचारांसाठी वैद्यकिय क्षेत्रामधून 'पद्मश्री पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. डॉ.डोंगरे हे आयुर्वेदिक डॉक्टर आहेत. ते गेली अनेक वर्ष कुष्ठरोंग्यांवर उपचार करीत आहेत. त्यांच्या या निरपेक्ष सेवेची दखल घेऊन त्यांना आज गौरविण्यात आले.

विंचुदंश आणि सर्पदंशावर केलेल्या अभ्यासासाठी डॉ.हिम्मतराव बावस्कर यांना 'पद्मश्री पुरस्कार' देऊन आज सन्मानित करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील विंचुदंश आणि सर्पदंश झालेल्यांचे प्राण त्यांनी वाचविले आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेत आज त्यांना नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विज्ञान व अभियांत्रिकी क्षेत्रातील योगदानासाठी डॉ.अनिलकुमार राजवंशी यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. तळागळातील शास्त्रज्ञ अशी डॉ.राजवंशी यांची ओळख आहे. निंबकर कृषि संशोधन संस्था (नारी) चे ते संचालक आहेत. डॉ. राजवंशी यांनी अक्षय ऊर्जा संशोधन, ग्रामीण आणि सतत विकास याविषयांवर त्यांचा तीस वर्षापेक्षा अधिक अभ्यास आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत आज त्यांना सन्मानित करण्यात आले.

केंद्रीय गृहमंत्रालयाच्यावतीने दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मपुरस्कारांची घोषणा करण्यात येते. यावर्षी एकूण १२८ पद्मपुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये ४ 'पद्मविभूषण', १७ 'पद्मभूषण' आणि १०७ 'पद्मश्री' पुरस्कारांचा समावेश आहे.

पुरस्कार घोषित झालेल्या मान्यवरांमध्ये ३४ महिलांचा समावेश आहे. १० अप्रवासी भारतीयांना हे मानाचे पुरस्कार जाहीर झाले असून १३ मान्यवरांना मरणोत्तर पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. यापैकी आज काही पुरस्कारांचे वितरण आज करण्यात आले आहेत. उर्वरीत पुरस्कार दुसऱ्या टप्प्यात २८ मार्च प्रदान करण्यात येतील.

---

Judge Mujawar Saheb Court

**Advocate : Pallavi Pawar**

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) AT PANVEL

M.A.NO.94 OF 2022
Next Date : 4/4/2022

1) Smt.Pratibha Anil Jadhav
Age : 43 yrs, Occ : housewife
2) Shri.Shramit Anil Jadhav
Age : 23 yrs, Occ :
Both are R/at. 2/31, MBPT colony
New nadkarni park, wadala east,
Mumbai — Applicants

V/s

Srusthi Anil Jadhav
Age : yrs, Occ : service
R/at. 2/31, MBPT colony
New nadkarni park, wadala east,
Mumbai — Opponent
New nadkarni park, wadala east,

WHEREAS, the abovenamed applicants have filed this M.A. in this court for grant of Heriship Certificate in respect of immovable property of Deceased Late ANIL VASUDEV JADHAV, who died on 05/06/2021.

**SCHEDULE OF PROPERTY**

All peace and parcel of property Residential unit building no.2, A wing flat no.301, at third floor, building known as Naman Residency at Dhansar, Tal.Panvel, Dist.Raigad, Area admeasuring carpet area of 26.25 sq. mtrs along with an additional / ancillary area of 9.747 sq. mtrs occupied under enclosed balcony sq/mtrs, terrace of 3.847 sq. mtrs, cupboard area of 1.012 sq. mtrs, totally admeasuring 36.359 sq. mtrs (391.368 sq.ft) located in 'A' wing in the 02 Building in Project titled as "NAMAN RESIDENCY"

AND WHEREAS if any person has right title, interest or share of any nature in the schedule property of the deceased above named is hereby invite to submit his / her/ their objection in this court within the period of 30 days from the date of the publication of this public notice.

As such in nothing is received with the stipulated period of 30 days from the date of publication of this public notice. This application of the applicant shall be allowed and the Heirship Certificate as prayed in the application shall be granted.

Given under my hand and seal of this Court on this 21 day of March 2022

Sd/- Jr.Clerk, Civil Judge (S.D.) Panvel | Court Seal | Sd/- Supt. Civil Judge (S.D.) Panvel

---

मा.गोडसे सो

**अ‍ॅड.माधुरी चतारे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व/क.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३८९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०४/२०२२

१) श्रीमती.प्रतिभा प्रभाकर गुजर
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सदनिका क्रं.२, तळमजला, बिल्डींग नं.ए-१६,
सेक्टर ७, मौजे : नवीन पनवेल, पुर्व,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६
२) सौ.सोनाली संजय नाजरे
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.१८१८/बी, सीमा स्नॅक्स, शिवाजी चौक,
तालुका : महाड, जिल्हा : रायगड, पिन नं.४०२३०१
३) सौ.समिधा अभिषेक वनारसे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.७०५, श्री बालाजी हाईटस्, पाडा नं.२,
शंकर मंदिर जवळ, लोकमान्य नगर, वागळे इस्टेट,
ठाणे, महाराष्ट्र, पिन कोड-४००६०४ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी प्रभाकर कृष्णा गुजर हे दि.१६/११/२०१८ रोजी ग्रेटर मुंबई, मुंबई येथे घरी मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत प्रभाकर कृष्णा गुजर यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची सिटी अ‍ॅण्ड इन्डस्ट्रीयल डेव्हलपमेंट कॉरपोरेशन लि. (सिडको लि.) यांचे हद्दीतील, सदनिका क्रं.२, तळ मजला, बिल्डींग नं.ए-१६, सेक्टर ७, मौजे : नवीन पनवेल, पूर्व, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, क्षेत्रफळ १७.२०० चौ.मी. बिल्टअप, सदनिका आहे. सदर सदनिका कै.प्रभाकर कृष्णा गुजर यांनी त्यांचे हयातीत दि.२९ डिसेंबर, १९९४ रोजीचे अ‍ॅग्रीमेन्ट ऑफ सेल या कराराने सिडको लि.यांचेकडून खरेदी केलेली आहे. सिडको लि. यांनी सदर सदनिकेचे पजेशन दि.२९/१२/१९९४ रोजी कै. प्रभाकर कृष्णा गुजर यांना दिलेले आहे व ते सदनिकेचे मालक आहेत.

सदर सदनिका / मिळकत सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी कै. प्रभाकर कृष्णा गुजर यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२१ माहे मार्च सन, २०२२ रोजी मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक, दि.न्या.व/क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.व/क.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

**अ‍ॅड.सुजाता पाटील ८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३६४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०४/२०२२

१) श्रीमती.शारदा दत्तात्रय हंकारे
वय : ५० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) कुमारी शुभांगी दत्तात्रय हंकारे
वय : २६ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कुमारी प्राजक्ता दत्तात्रय हंकारे
वय : २४ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.सदनिका नं.३०६, विंग बी, कैलास भवन,
प्लॉट नं.३९, सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ व अ.नं.३ यांचे वडील कै. श्री.दत्तात्रय तुकाराम हंकारे हे दि.०१/०१/२०२२ रोजी मिरज येथे मयत झाले. मयत कै.श्री.दत्तात्रय तुकाराम हंकारे यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्ता परिशिष्ट**
**अ) सदनिका नं.३०६, विंग बी, कैलास भवन, प्लॉट नं.३९, सेक्टर ४ खारघर, नवी मुंबई तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र ४१०२१०**
**एकूण क्षेत्रफळ : ५१३ चौ.फूट, बिल्टअप**
**ब) महात्मा फुले एनजीआर गणेश चाळ कमिटी मानखुर्द, चेंबुर मुंबई ४०००८८**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

**अर्जदाराचे वकील : अ‍ॅड.प्रियांजली जाधव**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय

दि.चौ.अर्ज नं.१६२४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०५/२०२२

१) श्रीम.आशाबाई अनिल नागरे
वय : ५० वर्षे, व्यव : गृहिणी
२) कु.सुवर्णा अनिल नागरे
वय : २९ वर्षे, व्यव : नोकरी
३) कु.सुरेखा अनिल नागरे
वय : २८ वर्षे, व्यव : नोकरी
४) कु.विश्वजीत अनिल नागरे
वय : २६ वर्षे, व्यव : नोकरी
अर्जदार क्रं.१ ते ४ सर्व रा.ए/१/५४,
महालक्ष्मी बिल्डींग, दक्षता पोलीस सोसायटी,
रमाबाई नगर, घाटकोपर (ईस्ट), मुंबई महाराष्ट्र ४०००७५ — अर्जदार

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे, वरील कै.अनिल तुकाराम नागरे त्यांचे दि.१२/०७/२०१७ रोजी मौजे : सायन म्युन्सिपल हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडीकल कॉलेज, बृहमुंबई महानगरपालिका एफ उत्तर विभाग, ता.जि.मुंबई उपनगर येथे मयत झाले आहेत. सदर मयत व्यक्तीस खालीलप्रमाणे वारसदार आहेत.

**कै.अनिल तुकाराम नागरे यांचे वारसदार**

| अ.क्र. | वारसाचे नाव | मयताशी नाते |
|---|---|---|
| १ | श्रीम.आशाबाई अनिल नागरे | पत्नी |
| २ | कु.सुवर्णा अनिल नागरे | मुलगी |
| ३ | कु.सुरेखा अनिल नागरे | मुलगी |
| ४ | कु.विश्वजीत अनिल नागरे | मुलगा |

वरील प्रमाणे अर्जदार हे कै.अनिल तुकाराम नागरे यांस वारसदार आहेत. या व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. कै.अनिल तुकाराम नागरे हे मयत झाले आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मिळकत तपशिल | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| कामोठे | सदनिका नं.१०२, बी विंग, पहिला मजला, त्रिमुर्ती हेरिटेज को.ऑप.हौ.सोसायटी लि., प्लॉट नं.६४, सेक्टर २०, कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड | ४४.१६ चौ.फुट बिल्टअप व ९.२९ चौ.फुट ओपन टेरेस |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषांगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.अनिल तुकाराम नागरे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७ माहे ३ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक, दि.न्या.क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/- सहा.अधिक्षक, दि.न्या.क.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आंबेवाडी ग्रा.पं.उपसरपंचपदासाठी जगन्नाथ धनावडे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या ग्रु. ग्रा.पं. आंबेवाडी या ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदासाठी जगन्नाथ धनावडे यांची नियुक्ती करण्यात आली.

येथील सरपंच सुरेश महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच पदाची निवडणुक घेण्यात आली. यामध्ये उपसरपंच पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जगन्नाथ गजानन धनावडे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणुकीच्या सर्व प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर जगन्नाथ गजानन धनावडे यांचा अर्ज वैध ठरवून त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणुक अधिकारी तथा सरपंच सुरेश महाबळे यांनी केली. या झालेल्या निवडणुक प्रक्रियेत सरपंच सुरेश महाबळे मावळते उपसरपंच श्रीकांत चव्हाण, सर्व सदस्य व सदस्या यांनी सहभाग घेऊन उपस्थिती दर्शवली. मावळते उपसरपंच श्रीकांत चव्हाण यांनी आपला उपसरपंच पदाचा कार्यकाळ पुर्ण केल्याने त्यांनी राजीनामा दिल्याने सदर उपसरपंच पदाची निवडणुक घेण्यात आली. आपल्या निवडीनंतर उपसरपंच जगन्नाथ धनावडे यांनी प्रतिक्रिया देताना, खा.सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांनी तसेच सरपंच व सर्व सदस्य यांनी माझ्यावर विश्वास ठेऊन माझी उपसरपंचपदी नियुक्ती केल्याने सर्वांना धन्यवाद दिले आहेत. तर ग्रा.पंचायत हद्दीतील विविध प्रकारच्या विकासकामांसाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## घराला लागलेल्या आगीत मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

पनवेल तालुक्यातील आंबिवली येथील एका घराला लागलेल्या आगीत घराचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

तालुक्यातील आंबिवली येथील हाशा भगत यांच्या घराला अचानकपणे आग लागल्याने घरातील रहिवाशांची चांगलीच धावपळ झाली. परिसरात राहणाऱ्या ग्रामस्थांनी तातडीने पाणी ओतून आग विझविण्याचा प्रयत्न केला तसेच अग्नीशमन दलाला तेथे पाचारण केले व त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. या आगीत घरातील रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने व इतर ऐवज जळून खाक झाला आहे. सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# किल्ला गाव वाकेश्वर मंदिर तिर्थक्षेत्र कसे होईल यासाठी प्रयत्नशील राहू : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील धाटाव पंचक्रोशीतील आध्यात्मिक इतिहास सर्वत्र ज्ञात आहे. आध्यात्मिक विचारसरणीचा वारसा किल्ला या गावाने अतिशय सुंदररित्या चालविला आहे. येथील वाकेश्वर मंदिराच्या सभोवताली निसर्गरम्य भूमी दिसत आहे. अनेक वर्षांचे हे मंदीर आणि या मंदिराची रचना पाहता जणू काही हे शिवकालीन मंदीराप्रमाणे असुन भविष्यात पंढरपुर, आळंदी तिर्थक्षेत्रा प्रमाणे किल्ला हे गाव, श्री वाकेश्वर तिर्थक्षेत्र कसे होईल या करिता प्रयत्नशील राहू असे अभिवचन खासदार सुनिल तटकरे यांनी दिले.



आ. अनिकेत तटकरे यांच्या स्थनिक विकास निधीतून निर्माण होत असलेल्या वाकेश्वर सामजिक सभागृहाच्या भूमीपुजन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर आ.अनिकेत तटकरे, तालुकाध्यक्ष विनोदभाऊ पाशिलकर, जेष्ठ नेते शंकर भगत, राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, रोहिदास पाशिलकर, अनिल भगत, योगेश बामुगडे, सरपंच नरेश पाटील, अमित मोहिते, ज्ञानेश्वर साळुंखे, प्रदीप बामुगडे, विष्णू लोखंडे, सरपंच रुपेश बामुगडे, जयवंत मुंढे, महेश बामुगडे, केशव भोकटे, अरविंद मगर विभागातील सरपंच उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना खा.सुनिल तटकरे पुढे म्हणाले या गावचे अनेक वर्षांपासूनचे आपुलकीचे नाते आहे. स्वर्गीय भगवान बुवा बामुगडे, जनार्दन मुंढे यानी राजकारणात मोलाची साथ दिली. भाईसाहेब या भागाचे नेतृत्व उत्तमरित्या करित होते. पुढे गावच्या विकासाला चालना मिळाली. पाणी प्रश्न सुटला आहे. किल्ला ते अशोकनगर रस्त्याचे प्रश्न मार्गी लागणार आहे.

भविष्यात विकासाच्या बाबतीत चिंता करण्याची गरज पडणार नाही. फार वर्षापूर्वी वाकेश्वर मंदीराचे जिर्णोध्दार झाले होते. त्यावेळी उत्पन्न कमी होते. सर्वाच्या त्यागातून हे मंदीर उभे राहिले आहे. या पुढे देखणे असे मंदिर उभे करु, तुम्ही वर्गणी गोळा करा कमी वर्गणी झाली तरी चालेल, पुढे लागतील तेवढा निधी मंदिराकरीता देऊ. असे शेवटी त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन रविकांत दिघे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता किल्ला ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व तरुण मंडळ तसेच मंदिर जिर्णोध्दार कमेटीने अथक परिश्रम घेतले.

# अपघातग्रस्त वाहन चालकाला केली पोलिसांनी मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अपघातग्रस्त वाहन चालकाला पोलिसांनी तात्काळ मदत केल्याने पुढील अनर्थ टळला आहे. वाशी खाडी ब्रिज या ठिकाणी मोटारसायकल वरून एक इसम सकाळी कामावर जात असताना ब्रिजवरील एक लोखंडी हेवी प्लेट बाजूला सटकल्याने सदर इसमाचा अपघात झाला होता. तरी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वाशी पोलीस ठाण्याच्या महिला सपोनी जोगळेकर यांनी रोड यंत्रणेची वाट न बघता पोलीस अंमलदार यांना मार्गदर्शन करून स्वत सोबत पोलिस अंमलदार पाटील याच्या मदतीने सहाशे किलो वेट असलेली लोखंडी प्लेट पुन्हा त्याच जागेवर बसून वाहतूक सुरळीत करून देऊन पुढील होणारे अपघात थांबवले. याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.



# देशी दारुचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील अजिवली गावातील साईलीला हॉटेलच्या बाजूला असलेल्या पानटपरीच्या बाजूकडील मोकळ्या जागेत देशी दारुचा साठा केल्याप्रकरणी एका इसमाला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्याकडून ४० बॉटल हस्तगत केल्या आहेत.

सदर ठिकाणी विनापरवाना देशी दारुचा साठा करून विक्री करण्यात येत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पो.नि.अंकुश खेडकर, सहा.पो.नि.प्रशांत शिर्के, पो.हा.भुमकर, पो.शि.सतीश दराडे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आरोपी अखिलेशसिंग रमेशसिंग यादव (२२) याला ताब्यात घेवून त्याच्याकडून ४० बॉटल ज्याची किंमत जवळपास १२०० रुपये इतकी आहे.

हस्तगत केली आहे व त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे कारवाई केली आहे.

# शिवसेना शाखेतर्फे मजगांव मध्ये शिवजयंती साजरी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मजगांव मध्ये शिवसेना शाखेतर्फे छत्रपति शिवाजी महाराज यांची जयंती (तिथीनुसार) उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी धर्मेंद्र जयस्वाल यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून नामदेव चोगले यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

शिवसेना शाखाप्रमुख लिलाधर गोयजी,माजी शाखाप्रमुख आदिनाथ अंबाजी, नथूराम बुल्लू, मनोहर मुंबईकर, अशोक कासेकर, सुरेश म्हात्रे, विकास म्हात्रे, एकनाथ भंडारी पदाधिकारी व शिवसैनिक यावेळी उपस्थित होते.

---

मा.राव साहेब कोर्ट

**ॲड.अनिल सुभाष जाधव**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३८७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०५/२०२२

१) कै.कचेर गोविंद पाटील मयत तर्फे वारस
१/१) श्रीमती.लक्ष्मीबाई कचेर पाटील
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
१/२) श्रीमती.गंगाबाई कचेर पाटील
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
१/३) श्री.दिपक कचेर पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
१/४) श्री.प्रदीप कचेर पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
१/५) श्री.संदीप कचेर पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
१/६) श्री.प्रमोद कचेर पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
१/७) श्री.प्रवीण कचेर पाटील
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.कोपरा गाव/खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

ज्याअर्थी कै.बामीबाई गोविंद पाटील ह्या दि.१०/०६/२००२ रोजी मौजे : कोपरा/खारघर येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.मुंगीबाई गोविंद पाटील ह्या दि.२९/०७/१९८४ रोजी मौजे : खारघर कोपरा येथे मयत झाल्या आहेत. वरील दोन्ही मयत स्त्री व्यक्तींच्या मृत्यू पश्चात अर्जदार क्रं.१/३ ते १/७ हे कायदेशीर वारसदार आहेत. तसेच त्यांची तळोजा, खारघर येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली मिळकती आहेत त्यांचे खालील प्रमाणे वर्णन

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकती**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| खारघर | ६७ | ४९ | ६ | ०-१६-० |
| खारघर | ६७ | ४९ | ८ | १-६९-० |

कै.बामीबाई गोविंद पाटील व सावत्र सासू कै.मुंगीबाई गोविंद पाटील यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात पॅरा नं.३ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.बामीबाई गोविंद पाटील व सावत्र सासू कै.मुंगीबाई गोविंद पाटील यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेलया मिळकती ह्या कै.बामीबाई गोविंद पाटील व सावत्र सासू कै.मुंगीबाई गोविंद पाटील यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२१/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मुजावर साहेब

**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**अर्जदारांचे वकील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३९२/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.२६/०४/२०२२

कै.प्रकाश रामभाऊ काकडे मयतचे वारस
१) श्री.पंकज प्रकाश काकडे
वय : ४२ वर्षे, धंदा : व्यापार
२) सौ.प्रणिता कमलेश कोळपकर
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.५०४, के विंग अेझीएनो,
वृंदावन सोसायटी मागे, व्ही.टी.सी.ठाणे, ता.ठाणे, जि.ठाणे
३) कु.प्रिती प्रकाश काकडे (लग्नापूर्वी)
सौ.प्रिती सागर पवार (लग्नानंतर)
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
वरील १ व ३ रा.पीएल-६-१४/९,
सिडको कॉलनी, अभ्युदय बँकेजवळ, सेक्टर १७,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. प्रकाश रामभाऊ काकडे यांचे दि.१८/१२/२०२१ रोजी श्री हॉस्पिटल सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून श्री.पंकज प्रकाश काकडे, वगैरे ह्यांनी कै.प्रकाश रामभाऊ काकडे यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन १**

**पी.एल-६/१४/२:९**
**सेक्टर नं.१७, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**रक्कम रु.१,९०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्वद हजार मात्र)**

**मिळकतीचे वर्णन २**

**फ्लॅट नं.२०४, दुसरा मजला (G+3), क्षेत्र ४७० चौ.मी.बिल्टअप,**
**शगुण कौ.हॉ.सौ.लि., प्लॉट नं.५६ & ६०,**
**सेक्टर ९, नवीन पनवेल (ईस्ट),**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**पैकी कै.प्रकाश रामभाऊ काकडे यांच्या अर्ध्या क्षेत्राकरिता**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रु.७,५०,०००/-**
**त्यापैकी ५० टक्के हिश्श्याची रक्कम रु.३,७५,०००/-**
**(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख पंच्याहत्तर हजार मात्र)**

**मिळकतीचे वर्णन ३**

**वार्ड नं.३७, हिंदनगर, ता.जि.वर्धा,**
**न.प.क्रं.६२६ व ६२६/१**
**लांबी-४५ फुट, रुंदी-१२ फुट ५ इंच,**
**यांचे क्षेत्रफळ-५६२ फुट ५ इंच (५२.२८) चौ.मी. व**
**बांधकाम क्षेत्रफळ ३१.२**
**रक्कम रु.४,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख मात्र)**

**मिळकतीचे वर्णन ४**

**मौजे : वागदार, प.ह.नं.४६, ग्रा.प.ईसासनी ता.हिंगण, जि.नागपूर**
**येथील खसार नं.९ मधील रायटाऊन २ मधील ब्लॉक सी यातील**
**रो.हाऊस नं.५९**
**सुपर बिल्टअप एकूण क्षेत्रफळ ४६४.४९ चौ.फूट (४३.१५२) असून यावर**
**बांधकाम केलेला बिल्टअप एरिया ३८६.५४ चौ.फुट (३५.९१ चौ.मी.)**
**पैकी कै.प्रकाश रामभाऊ काकडे यांच्या अर्ध्या क्षेत्राकरिता**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रु.५,४०,०००/-**
**त्यापैकी ५० टक्के हिश्श्याची रक्कम रु.२,७०,०००/-**
**(अक्षरी रक्कम रुपये दोन लाख सत्तर हजार मात्र)**

वरील मिळकत ही कै.प्रकाश रामभाऊ काकडे यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्री.पंकज प्रकाश काकडे वगैरे हे कै.प्रकाश रामभाऊ काकडे यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.पंकज प्रकाश काकडे वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.प्रकाश रामभाऊ काकडे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२१/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

**अर्जदाराचे वकील : ॲड.विजया म्हात्रे**

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालय

दि.चौ.अर्ज नं.७०/२०२१
नि.नं.५२/ड
ने.ता.२८/०४/२०२२

१) श्री.दत्ता बबन पाटील
वय : ५७ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.जांभुळपाडा, ता.उरण, जि.रायगड
२) श्रीम.निर्मला काशिनाथ पाटील
वय : ६४ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.नागाव-गोसपाडा, ता.उरण, जि.रायगड
३) कै.अनुसया प्रभाकर पाटील (मयत) यांचे वारस
३/१) केतन प्रभाकर पाटील
वय : २८ वर्षे, व्यव : नोकरी
रा.मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड
३/२) सौ.पुजा प्रशांत कडू पुर्वाश्रमीची
पुजा प्रभाकर पाटील
वय : २८ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड
४) श्रीम.यशोदा उर्फ निर्मला धर्मा पाटील
वय : ६२ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.कोळखे ओएनजीसी कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीम.रजनी रोहिदास पाटील
वय : ६५ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड
६) सौ.सुगंधा गणेश पाटील
वय : ३८ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.बामणडोंगरी, पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
७) सौ.सुनिता अशोक घरत
वय : ३७ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.खोपटे, पो.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
८) सौ.सविता सचिन ठाकूर
पुर्वाश्रमीची सविता रोहिदास पाटील
वय : ३१ वर्षे, व्यव : वकीली
रा.बालई, उरण, ता.उरण, जि.रायगड
९) श्रीम.सुभद्रा रोहिदास पाटील
वय : ५७ वर्षे, व्यव : गृहिणी
१०) श्री.राजेश रोहिदास पाटील
वय : २४ वर्षे, व्यव : नोकरी
११) श्रीम.अश्विनी रोहिदास पाटील
वय : २५ वर्षे, व्यव : गृहिणी
१२) श्री.सिद्धेश रोहिदास पाटील
वय : २० वर्षे, व्यव : नोकरी
अ.क्र.९ ते १२ सर्व रा.जांभुळपाडा,
पो.जासई, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे, वरील कै. चांगुणाबाई बबन पाटील दि.०८/०९/२०२० रोजी मौजे : जांभुळपाडा, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.चांगुणाबाई बबन पाटील ह्या मयत झाल्या आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीची ह्या सरकारतर्फे सिडकोने ''नव्या मुंबई'' योजनेसाठी भुसंपादीत केल्या आहेत. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे/युनिट केस | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | जासई ११/९० | १०३ | १० | ००.९७.०० पो.ख.०.०७.०० | ३.१२ |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.चांगुणाबाई बबन पाटील यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सवतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९ माहे मार्च सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

---

मा.राव साहेब कोर्ट

**अर्जदार यांचे वकील**
**ॲड.अर्चना म्हस्कर**
**ॲड.रजनी गोवारी**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३९५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०५/२०२२

१) श्रीमती.संध्या मोतीराम गायकर
उ.व.४१, धंदा : गृहिणी
२) कुमारी प्रणाली मोतीराम गायकर
उ.व.१९, धंदा : शिक्षण
३) कुमारी जिनल मोतीराम गायकर
उ.व.१७, धंदा : शिक्षण
४) कुमारी परिना मोतीराम गायकर
उ.व.१५, धंदा : शिक्षण
५) कुमार अविश मोतीराम गायकर
उ.व.१३, धंदा : शिक्षण
६) कुमार अनिश मोतीराम गायकर
उ.व.१३, धंदा : शिक्षण
अर्जदार क्र.३ ते ६ करिता अज्ञान
पालनकर्ता म्हणून आई
श्रीमती.संध्या मोतीराम गायकर
उ.व.४१, धंदा : गृहिणी
७) श्रीमती.निरा रामा गायकर
उ.व.७२, धंदा : काहीनाही
वरील सर्व रा.रामा गायकर, घर नं.१५६,
हनुमान मंदिराजवळ, कामोठे गाव,
सेक्टर १४, कामोठे, पनवेल, रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.मोतीराम रामा गायकर यांचे दि.२/११/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे येथे निधन झाले आहे. यांचे मालकीचे व ताबेकब्जातील मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतींमध्ये वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**कोष्ठक (अ)**

**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामोठे | ३५४ | ३५ | १ | ०-३०-०३ |
| | | | ३१ | २ | ०-३०-०१ |
| | | | ३४ | १ | ०-९३-७ |
| | | | ६७ | २ | ०-११-०० |
| २ | कामोठे | ४१६/३४ | ३४९ | १ | ०-१६-०२ |
| | | | ३४९ | ३ | ०-१८-०७ |
| | | | ३४९ | १२ | ०-३४-०० |
| ३ | पनवेल | ४६३ | ६३२ | ३ | ०-४८-०६ |

**कोष्ठक (ब)**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

**१५अ/२०, ग्रॅंडएव्हर, जी+७, प्लॉट नं.३३ व ३४, सेक्टर २०**

| अ.क्र. | सदनिका व गाळा क्र./विंग | मजला | क्षेत्रफळ कारपेट चौ.मी. | क्षेत्रफळ टेरेस चौ.मी. | सदनिका मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | सदनिका जी-१०३ | पहिला | ५२ | ५५.४६ | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |
| २ | सदनिका एफ-१०४ | पहिला | ५४.१० | ४०.१३ | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |
| ३ | सदनिका डी-३०१ | तिसरा | ३४.७७० | २.६० | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |
| ४ | सदनिका जी-५०१ | पाचवा | ३४.७७० | २.६० | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |
| ५ | सदनिका जी-५०४ | पाचवा | ३४.७७० | २.६० | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |
| ६ | सदनिका ई-६०४ | सहावा | ५४.१०० | ३.४३ | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |
| ७ | गाळा क्रं. १७ | तळ मजला | १९.१६० | लॉफ्ट ६.३८ | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |
| ८ | गाळा क्रं. २१ | तळ मजला | ३७.६९० | लॉफ्ट १२.५६ | मोतीराम रामा गायकर संतोष रामा गायकर |

**कोष्टक (क)**

**मौजे : मालाठे, ता.तळा, जि.रायगड येथील सर्व्हे नं.२१७**

**क्षेत्र : एकूण ०.९६.५० पैकी क्षेत्र ०.४८.००, आकार ५.१२ ही मिळकत**

वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.मोतीराम रामा गायकर यांचे मालकीची व ताबेकब्जातील आहेत. कै.मोतीराम रामा गायकर यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार क्रं.१ ते ७ यांचे नावे होण्यासाठी अर्जदार क्रं.१ ते ७ यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.मोतीराम रामा गायकर यांना अर्जदार क्रं.१ ते ७ हेच सदर मिळकतीसंदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकती न घेतल्यास हे मा.न्यायालय अर्जदार १) श्रीमती.संध्या मोतीराम गायकर, २) कुमारी प्रणाली मोतीराम गायकर, ३) कुमारी जिनल मोतीराम गायकर, ४) कुमारी परिना मोतीराम गायकर, ५) कुमार अविश मोतीराम गायकर, ६) कुमार अनिश मोतीराम गायकर, ७) श्रीमती.निरा रामा गायकर हे कै.मोतीराम रामा गायकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकती संदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२१/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावरच : आ.महेंद्र थोरवे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिवसेनेत जी काही पदे कार्यकर्त्यांना दिलेली आहेत ही वंदनीय हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची एक घटना असून त्या घटने प्रमाणे प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत आपसातील मतभेद बाजूला सारून आगामी निवडणुका ह्या स्वबळावरच लढवायच्या आहेत त्यादृष्टीने सर्वांनी तयारीला लागा असे आवाहन कर्जत खालापूर मतदार संघाचे विद्यमान आमदार महेंद्र शेठ थोरवे यांनी केले.



शनिवार दिनांक १९ मार्च २०२२ रोजी सकाळी ११ वाजता शिवतीर्थ, पोसरी तालुका कर्जत येथील कार्यालयात शिवसेनेचे कर्जत तालुकाप्रमुख उत्तम कोळंबे यांच्यामार्फत कर्जत तालुक्यातील शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांसाठी महत्त्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी कर्जत-खालापूरचे कार्यसम्राट आमदार मा.महेंद्र थोरवे बोलत होते.यावेळी आमदार महेंद्रशेठ थोरवे, जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांनी आयोजित केलेल्या बैठकीचा आढावा घेतला.यावेळी तालुक्यातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी,महिला आघाडीच्या सदस्या त्याचप्रमाणे युवा सेनेचे पदाधिकारी, युवती सेनेच्या पदाधिकारी आवर्जून उपस्थित होत्या. या बैठकीमध्ये आगामी काळात होणाऱ्या निवडणुका शिवसेना हि स्वबळावर लढणार असे आव्हान केले.

आमदार महेंद्रशेठ थोरवे पुढे म्हणाले की,पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी तालुक्यातील पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. आम्ही राज्य शासनाच्या माध्यमातून जवळपास ९२ कोटी रुपयांचा निधी तालुक्यातील एकंदरीत संपूर्ण विकास कामासाठी उपलब्ध करून घेतला आहे आणि या कर्जत तालुक्यातील ऐतिहासिक स्थळांचा कायापालट करून खऱ्या अर्थाने या तालुक्याचे नंदनवन आपल्याला सर्वांना मिळून करावयाचे आहे.जे जे पदाधिकारी आहेत त्यांनी फक्त पदे घेऊन चालणार नाही तर आपल्या पदाचे गांभीर्य लक्षात घेऊन पक्षाच्या आदेशानुसार कामे केली पाहिजेत, विशेष म्हणजे आजच्या या महत्वाच्या बैठकीस माथेरान मधील शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, माजी नगरसेवक संदीप शिंदे आणि युवा सेनेचे गौरंग वाघेला, युवती सेनेच्या अंकिता तोरणे यांनीच आपली उपस्थिती दर्शवली आहे बाकीचे पदाधिकारी काहीही न पटणारे कारण पुढे करत उपस्थित राहिले नाहीत तर एकप्रकारे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांवर दबावतंत्र वापरून त्यांना हजर राहू दिले नाही ही पक्षाच्या वाढीसाठी अत्यंत गहन बाब म्हणावी लागेल. अशांना पक्षात राहण्याचा सुध्दा अधिकार नाही. ज्यांना आपल्या पदाला आणि विशेष म्हणजे ज्या पक्षामुळे आपण आहोत याबाबतीत जर गांभीर्य नसेल तर त्यांनी आपली पदे रिक्त करावीत कुणावाचून पक्ष रहात नाही तर पक्षामुळे आपण आहोत याचेही भान पदाधिकाऱ्यांना असणे आवश्यक आहे असेही महेंद्र शेठ थोरवे यांनी खासकरून नमूद केले. याबाबत माथेरान शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की,२०१६ साली आपल्या पक्षाची एकहाती सत्ता स्थापन केली होती. गावात अनेक विकासकामे आदरणीय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे, आमदार महेंद्र शेठ थोरवे,राज्य शासन यांच्या प्रयत्नांमुळे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे याच कामाच्या जोरावर पुन्हा एकदा नगरपरिषदेवर आम्ही निर्विवाद बहुमत प्रस्थापित करू त्यामुळे आम्हाला कुणाशीही आघाडी करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. ज्यांना ज्यांना जिल्ह्यातील कार्यकारिणीचा निर्णय मान्य असेल ते पक्षात राहतील अन्यथा जे ज्या पक्षातून सेनेत आलेत त्यांना आपल्या स्वगृही जाण्यासाठी मार्ग मोकळा आहे आमदार महेंद्रशेठ थोरवे, जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे यांच्या निर्णयाशी आम्ही सहमत आहोत आगामी निवडणूक स्वबळावर लढवून सत्ता स्थापन करू यात तिळमात्र शंका नाही असे चंद्रकांत चौधरी यांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त...

### लॅपटॉपची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पार्क करून ठेवलेल्या गाडीतून सव्वा लाख रुपयांच्या लॅपटॉपची अज्ञाताने चोरी केली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघर से-१०, येथील सौम्यअंशू सूर्यान्शु सरकार यांनी त्यांची कार पार्क करून ठेवली होती. बिल्डिंगच्या खाली आल्यावर ते लॅपटॉप घेण्यास गेले असता कारच्या मागील बाजूच्या उजव्या बाजूचा दरवाजा उघडा असल्याचे त्यांना दिसले. अज्ञात चोरट्याने लॅपटॉपची चोरी केली आहे.

### तळोजा फेज परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील तळोजा फेज सेक्टर ११ परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ५५ वर्षे आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा पो.उपनिरीक्षक अनंत लांब यांच्याशी संपर्क साधावा.

### साहित्य वसंतोत्सव सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या साहित्य साधना या समूहाच्या वतीने 'साहित्य वसंतोत्सव' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवीन पनवेलमधील सिडको उद्यानातील खुल्या रंगमंचावर हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला सिंधुदुर्ग रहिवासी संघाचे अध्यक्ष केशव राणे व पदाधिकारी तसेच रॉयल एज्युकेशन असोसिएशनच्या संस्थापक नाजनीन पालेकर, जाकीर पालेकर आदी मान्यवरांसह साहित्यप्रेमींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. प्रसिद्ध साहित्यिक शंकर आपटे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम संपन्न झाला. यामधे स्व. लता मंगेशकर व सिंधुताई सकपाळ यांना शब्दसुमनांजली, व्यक्तिचित्रण, कथा, अलक, ललित, कविता, विडंबनगीत अशा अनेक साहित्यकृतींचे सादरीकरण ज्येष्ठ आणि नवोदित साहित्यप्रेमीनी केले. शंकर आपटे व वरदा जोशी यांनी कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. शेखर अंबेकर, तुषार दानवे, सुजाता कुलकर्णी, अपर्णा साठे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. माधव भागवत या युवा कलाकाराने गायकाना तबला साथ केली.



# शिवसेनेच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद; ६५ दात्यांनी केले 'रक्ता'चे नाते घट्ट

**दै.रायगड नगरी । तळा**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून तळा तालुका शिवसेनेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले शिवसेनेच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला माणसाच्या आयुष्यातील सगळ्यात मोठा दानधर्म म्हणजे रक्तदान अपघातामुळे किंवा एखादी छोटी शस्त्र-क्रिया करण्यासाठी, किंवा कोणत्याहि आजारपणामुळे मानवाला रक्ताची गरज हि दुसरया व्यक्तीकडून भासतेच कारण हा जीवन मरणाचा प्रश्न असतो. त्यामुळेच रक्तदानाला विशेष महत्व आहे श्रेष्ठदान म्हणून.आपल्यामुळे कोणाचा तरी जीव वाचतोय हि भावना खरच खूप सुखा-वणारी असते.कारण जे आपले आहेत त्यांच्यावर कुणीही प्रेम करतं पण जे आपले नाहीत त्यांच्यावर प्रेम करणं हेच खरं प्रेम आणि हाच खरा माणुसकी धर्म. एक साधा 'विचार' सुद्धा आयुष्याला नवं चैतन्य देऊन जाते. 'आपण जे पेरतो ते उगवतेच'.ज्या समाजात आपण राह-तो त्या समाजाचे पारणं फेडण्याची संधी म्हणजे रक्तदान.हेच काम तळा तालुका शिवसेनेच्या



वतीने ब्राह्मण हॉल येथे जिल्हा शासकीय रक्तपेढी अलिबाग यांचे संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी तळा शहरारसह तालुक्यातील असंख्य दात्यांनी या रक्तदानास आपला सहभाग नोंदवला.यावेळी ६५ रक्त पीशव्यांचे संकलन करण्यात आले. यावेळी तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके, नगरसेविका नेहा पांढरकामे, नगरसेवक नरेश सुर्वे, माजी सरपंच नमित पांढरकामे, लिलाधर खातू तळा प्रेस क्लब अध्यक्ष संजय रिकामे, पत्रकार पुरुषोत्तम मुळे, किशोर पितळे, डी. टी. आंबेगावे, श्रीकांत नांदगावकर, देवयानी मोरे, विराज टिळक आदी मान्यवर उपस्थित होते. रक्तदान श्रेष्ठ दान, या उक्तीप्रमाणे आपले रक्तदान कोणाचा तरी जीवन वाचवणारे असते म्हणून रक्तदानास सर्वश्रेष्ठ मानले जाते, असे मत शिवसेना तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ यांनी व्यक्त केले यावेळी असंख्य दात्यांनी या रक्तदानास आपला सहभाग नोंदवला जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ.मोहन गोसावी व त्यांचे सहकारी यांचे तळा शिवसेनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तळा तालुका शिवसेना पदाधिकारी यांनी रक्तदान शिबिराचे उत्तम नियोजन करुन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला यावेळी शिवसेनेच्या वतीने तळा तालुक्यातील सर्व पत्रकारांचा शाल श्रीफळ सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# मुरुड शहर शिवसेनेच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड शहर शिवसेनेच्या वतीने आज तिथीनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या शिवपुतळ्याला शिव-सेना माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील यांच्या हस्ते पुजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर मुरुड नगरपरिषदे पासून भव्य अशा मोटारसायकल रॅली काढून संपूर्ण शहरात शिव घोषणा देत वातावरण निर्मिती केली.

आज तिथीनुसार शिवजयंती मुरुड शहर शिवसेनेच्या वतीने साजरी करण्यात आली. दोन वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर कोरोनाचे ओसरलेल्या संकटानंतर मोठ्या उत्साहात शिवसैनिकांनी शिवजयंतीचे आयोजन केले होते. मुरुड शहरातील दत्तवाडी छ. शिवाजी चौकातील शिवपुतळ्याचे, नंतर लक्ष्मीखार येथील छ. शिवपुतळ्याचे शेवटी अलकापुरी येथील छ. शिवपुतळ्याचे पुजन करुन या मोटारसायकल रॅलीचा समारोप करण्यात आला. मुरुड नगरपरिषदेचै माजी नगराध्यक्ष बाळकृष्ण गोंजी यांनी रॅलीचा समारोप केला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, शहर प्रमुख अशिल ठाकुर, उप शहरप्रमुख प्रशांत कासेकर, उपशहरप्रमुख विजय वाणी, तालुका युवा प्रमुख कृणाल सतविडकर, महेंद्र मोहिते, रुपेश जामकर, अच्युत चव्हाण, पांडुरंग आरेकर, सचिन करंदेकर, मनोज कमाने, आदेश दांडेकर, महिला संघटक शुभांगी करडे, युगा ठाकूर, माजी शहर प्रमुख दिपाली जामकर पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



# द्रोणागिरी शहर मनसे तर्फे शिवजयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवजयंती हा महत्वाचा सण तिथिप्रमाणे उत्साहात साजरा करण्याचे आदेश मनसे प्रमुख राजसाहेब ठाकरे यांनी दिले होते. त्याच आदेशाने पालन करत उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेने तर्फे तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यामध्ये द्रोणागिरी नोड मधील सर्व शिवभक्तांनी एकत्र येऊन महाराजांच्या मुर्तीचे दर्शन घेतले. व लहान मुलांनी सहभागी होऊन शिव व्याख्यान तसेच पोवाडे व भाषणं केली. सर्व सहभागी होणाऱ्या सर्व लहान मुलांना सन्मानचिन्ह देऊन मनसे पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष अतुलशेठ भगत, निलेश कोर्लेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच मनसेचे सर्व पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक यांनी सुध्दा उपस्थित राहुन कार्यक्रमात सहभागी झाले. शिवजयंती साजरी करण्याचे आयोजन मनसे शाखा बोकडविरा व मनसे शाखा नविन शेवाचे सर्व पदाधिकारी यांनी केले.

# फलकावर हुतात्मा हिराजी पाटील स्मारक मानिवली असे नाव असावे : राष्ट्रवादीची मागणी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मुरबाड रोड वरील कळंब पोही येथील एम एस आर डी सी ने लावलेल्या शासकीय फलकावर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील स्मारक मानिवलीहे नाव देण्यात यावी अशी मागणी कर्जत तालुका,राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष सागर शेळके यांनी केली आहे. कर्जत कळंब रोड वरील पोही येथील एम एस आर डी सी च्या फलकावरील सगुणा बाग हे नाव एम एस आर डी सी ला केलेल्या पत्र व्यवहारानुसार काढण्यात आले आहे .सदर बोर्डावर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील स्मारक मनिवली हे नाव देण्यात यावे अशी मागणी दि.७ मार्च २०२२ च्या पत्रात करण्यात अली होती. सदर नाव हे २० दिवसाच्या आत देण्यात यावे असा अल्टिमेटम दिला होता परंतु सदर नाव एम एस आर डी सी कडून अद्याप पर्यंत टाकण्यात आलं नाही दि.२७ मार्च ला हा अल्टीमेटम पूर्ण होत आहे, २७ मार्च पर्यंत हे नाव टाकले गेले नाही तर राष्टवादी युवक काँग्रेस कर्जत तालुक्याच्या वतीने पोही येथे तीव्र आंदोलन करून सदर फलकावर दि.२८ मार्च २०२२ या तारखेला हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील स्मारक मानिवली हे नाव राष्ट्रवादी युवक काँग्रेस कर्जत यांच्या वतीने टाकण्यात येईल याची एम एस आर डी सी ने नोंद घ्यावी असे कर्जत तालुका,राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष सागर शेळके यांनी कळवले आहे.

---

मा.राव साहेब कोर्ट

**वकील : एन.एस.साळुंखे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अर्ज नं.३४७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०४/२०२२

श्रीमती.इंदुबाई रामचंद्र साळुंखे
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.रुवले, पो.सणबुर, ता.पाटण, जि.सातारा — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.किरण रामचंद्र साळुंखे हे करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवासी होते. त्यांचा मृत्यू दि.१४/११/२०२० रोजी मौजे : रुवले, पो. सणबुर, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाल्याने अर्जदार यांनी कै. किरण रामचंद्र साळुंखे यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसपत्र मिळणेकामी अर्ज केला आहे.

**परिशिष्ट 'अ' मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.३०१, तिसरा मजला, गोकुळधाम, प्लॉट नं.१०६, सेक्टर-०५, करंजाडे नोड, ता.पनवेल, जि.रायगड. क्षेत्रफळ २८.६३ चौ.मी. कारपेट + ४.३१ चौ.मी. बाल्कनी**

वरील अर्जदार श्रीमती.इंदुबाई रामचंद्र साळुंखे हे कै.किरण रामचंद्र साळुंखे ह्यांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते श्रीमती.इंदुबाई रामचंद्र साळुंखे यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत हे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

कोर्ट मा.मुजावर साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.जगदीश ठाकूर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.२५२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०४/२०२२

१) श्रीमती.शितल सिद्धार्थ कांबळे
वय : ३८ वर्षे
रा.रुम नं.२०५, जास्मिन बिल्डींग, प्लॉट नं.१,२,३,
सेक्टर-९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.स्नेहा रोहित जाधव
वय : २१ वर्षे
रा.३०/३११, माधकुंज, महात्मा ज्योतीबा फुले हौ.सो.,
महाराष्ट्रा नगर, मानखुर्द, सबअर्बन मुंबई ४०००८८ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ चे वडील कै.सिद्धार्थ दौलत कांबळे हे दि.२६/०५/२०२१ रोजी मौजे मुंबई येथे मयत झालेले असून कै. सिद्धार्थ दौलत कांबळे यांची आई कै.भागीरथीबाई दौलत कांबळे ही देखील दि.१३/०१/२०११ रोजी मयत झालेली आहे. सबब अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ हिचे वडील कै.सिद्धार्थ दौलत कांबळे यांचे मालकीची व त्यांचे नावे नोंदीत ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती असून सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**१) फ्लॅट नं.२०५, बी, दुसरा माळा, जास्मिन बिल्डींग, क्षेत्र ६२५ स्के. फि., प्लॉट नं.१,२,३, सेक्टर-९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**२) शॉप नं.५, ए-विंग, बिल्डींग नं.१, तळमजला, गट नं.५/९, ५/११, ५/१२, ५/१४, मौजे : चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीत मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२१/०३/२०२२ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.सोनावणे साहेब

**ॲड.रविंद्र पा. केणी**
**अर्जदार तर्फे वकील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३८६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०४/२०२२

कै.सुभाष शंकर मालुसरे (मयत) चे वारस
१) श्रीमती.शांताबाई शंकर मालुसरे
उ.व.८५, धंदा : घरकाम
२) श्रीमती.सुरेखा सुभाष मालुसरे
उ.व.५४, धंदा : घरकाम
३) श्री.किरण सुभाष मालुसरे
उ.व.३०, धंदा : नोकरी
४) श्री.रोशन सुभाष मालुसरे
उ.व.२८, धंदा : नोकरी
वरील सर्व रा.३०२, ब्रम्हांड स्प्रिंग, फिल्ड, से.१३,
प्लॉट नं.१३१, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.ज्योत्स्ना प्रताप जगताप
उ.व.३६, धंदा : घरकाम
रा.यशवंत नगर, अकलुज, ता.माळशिरस,
जि.सोलापूर ४१३१०१
६) सौ.उमा अमित निबाळकर
उ.व.३३, धंदा : घरकाम
रा.डोले वस्ती, वडगाव, पुणे ४१२१०३ — अर्जदार

ह्या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार ह्यांचे पती / वडील कै.सुभाष शंकर मालुसरे हे दि.०२/०१/२०२२ रोजी मौजे : लव्हेरी, पो.जोगवडी, ता.भोर, जि.पुणे येथे मयत झाले आहेत. त्याच्या मृत्यूसमयी त्यांचे नावे व मालकीचा मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील बांधकामीत ''ब्रम्हांड स्प्रिंग फील्ड'' या इमारतीमधील, तिसरा मजल्यावरील फ्लॅट क्र.३०२, प्लॉट नं.१३१, सेक्टर-१३, खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड ज्याचे क्षेत्र ५६५ चौ.फु. (४४.१० चौ.मी. बिल्टअप) अशा वर्णनाचा फ्लॅट होता व आहे. सदर मिळकती संदर्भात कै. सुभाष शंकर मालुसरे यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे वारसदार म्हणून घोषित करून अर्जदारांच्या नावे वारसदाखला मिळावा यासाठी मे.न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

सबब कै.सुभाष शंकर मालुसरे याच्या वारसाहक्कासंबंधी अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तींनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकती स्वतः अगर वकीलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत अन्य कोणाची हरकत वगैरे न आल्यास आणि अर्जदाराने दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदाराच्या लाभांत वारस दाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२१/०३/२०२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

**ॲड.सुजाता पाटील ८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३६३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०४/२०२२

१) श्रीमती.शारदा दत्तात्रय हंकारे
वय : ५० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) कुमारी शुभांगी दत्तात्रय हंकारे
वय : २६ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कुमारी प्राजक्ता दत्तात्रय हंकारे
वय : २४ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.सदनिका नं.३०६, विंग बी, कैलास भवन,
प्लॉट नं.३९, सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ व अ.नं.३ यांचे वडील कै. श्री.दत्तात्रय तुकाराम हंकारे हे दि.०१/०१/२०२२ रोजी मिरज येथे मयत झाले. मयत कै.श्री.दत्तात्रय तुकाराम हंकारे यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**चल मालमत्ता परिशिष्ट**
**अ) चारचाकी गाडीचे वर्णन**

| | |
|---|---|
| REG NO | - MH46BK9347 |
| CHASSIS NO | - MA3EXGL1S00393224 |
| ENGINE NO | - K15BN1064783 |
| MODEL | - CIAZ SMART HYBRID ZETA |

**ब) पेशन्स पेमेन्ट आदेश महाराष्ट्र शासन**
**अर्ज नं.१०१९४३५२५७**
**पी.पी.ओ.नं.एम १११९०१३९७३३३**

**क) खाते नं.३७९३९८५२८९८ स्टेट बँक ऑफ इंडिया मधील सध्या पर्यंतची रक्कम**

**ड) खाते नं.१०८९६०६५३९४ स्टेट बँक ऑफ इंडिया मधील सध्या पर्यंतची रक्कम**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे भारतीय वारस कायदा १९२५ कलम ३७२ अन्वये सक्सेशन सर्टीफिकेट देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**